RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ४३

दि. ०४ जून २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## दिल्लीत भीषण अग्नितांडव! हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत २१ जणांचा मृत्यू; मृतांमध्ये विदेशी नागरिकांचा समावेश

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रीय राजधानी दिल्लीत आगीच्या घटना वाढत असून आजही भीषण आगीत २१ जणांचा होरपळून मृत्यू झाला. नवी दिल्लीतील मालवीय नगरमधील बेड अँड ब्रेकफास्ट योजनेअंतर्गत चालवल्या जाणार्या हॉटेलला भीषण आग लागली होती. ही आग आता अटोक्यात आणण्यात आली आहे. तर, मृतांमध्ये अफ्रिकन देशातील विदेशी नागरिकांचा समावेश असल्याची माहिती दिल्ली पोलिसांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या घटनेची दखल घेतली असून त्यांनी मृतांच्या नातेवाईकांना २ लाखांची मदत जाहीर केली.

दिल्ली अग्निशामक दलाला (इए) सकाळी पावणे दहा वाजता फ्लरिश स्टे या हॉटेलला आग लागल्याची माहिती मिळाली. सुरुवातीला अग्निशामक दलाच्या जवानांनी तळघरातून तीन जणांची सुटका केली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. नेहरू प्लेस अग्निशामक केंद्राचे विभागीय अधिकारी रवींदर हे स्वत: घटनास्थळी उपस्थित झाले.

मालवीय नगरचे आमदार सतीश उपाध्याय यांनी सांगितलं की, सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. आम्ही तातडीने संपूर्ण यंत्रणा सक्रिय केली. आपत्ती व्यवस्थापन संघ, आमच्या भागातील जिल्हा दंडाधिकारी, स्टेशन हाऊस ऑफिसर, उपविभागीय दंडाधिकारी आणि महानगरपालिकेचे उपायुक्त यांच्याशी संपर्क साधला. मी स्वत:ही घटनास्थळी आलो आहे.

# श्रीहरी कांबळे यांचे जीवन पँथर चळवळीला समर्पित : डॉ. जयद्रथ जाधव

**लातूर/प्रतिनिधी :** दलित, शोषित, पीडित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात खंबीरपणे लढा देऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी ज्येष्ठ दलित पँथर श्रीहरी कांबळे यांनी आपले जीवन समर्पित केले,असे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालय रेणापूर येथील डॉ.जयद्रथ जाधव यांनी केले.

विश्वजीत प्रतिष्ठानच्या वतीने रविवार,दि.३१ मे २०२६ रोजी श्रीहरी कांबळे लिखित संघर्षपिटक या आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा ज्येष्ठ विचारवंत डॉ.सुरेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.त्यावेळी डॉ.जयद्रथ जाधव भाष्य करत होते. मंचावर ॲड.बळवंत जाधव,ॲड.वैभव सूर्यवंशी,प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, ग्रंथाचे लेखक श्रीहरी कांबळे व सुरेखा कांबळे उपस्थित होते.



डॉ.जयद्रथ जाधव संघर्षपिटक या आत्मचरित्राचा सविस्तर परिचय देत लेखक श्रीहरी कांबळे यांची जडणघडण दलित पँथर या चळवळीमधून झालेली आहे. दलित पँथर या चळवळीने दलित समाजात वैचारिक परिवर्तनाबरोबरच सवर्ण समाजाकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधामध्ये आवाज उठविला. एकाच वेळेस प्रबोधन व अन्याय अत्याचाराच्या विरोधात खंबीर भूमिका श्रीहरी कांबळे यांनी घेतली. नामांतर लढा, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाढ, लातूरच्या एस.टी.डिव्हिजनसाठी आंदोलन, लातूर नगर परिषदेत मराठवाडा म्युनिसिपल युनियन या माध्यमातून त्यांनी समाजाला न्याय मिळवून दिला. श्रीहरी कांबळे हे प्रबोधनातून परिवर्तनाचा विचार समाजामध्ये रूजवणारे कार्यकर्ते आहेत. गावोगाव होणारे कीर्तन,सप्ते या परंपरेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गौतम बुद्ध,महात्मा जोतिराव फुले, संत तुकाराम यांच्या चरित्राचा अभ्यास करण्याचा पर्याय समाजाला दिला.यामधून अंधश्रद्धा,कर्मठ रूढी परंपरेचा त्याग करून सामाजिक समतेचा संदेश दिला. संघर्षपिटक हे आत्मचरित्र दलित पँथर व आर. पी.आय. या पक्षात काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे आत्मचरित्र आहे. श्रीहरी कांबळे यांचे संपूर्ण जीवन त्यांनी चळवळीसाठी समर्पित केले आहे.

प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी दलित आत्मकथनाचा परिचय करून दिला. श्रीहरी कांबळे यांनी समाजाच्या हितासाठी वेळप्रसंगी कुटुंबाकडे दुर्लक्ष केले.कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ठीक नसतानाही अन्याय,अत्याचाराविरोधात ते खंबीरपणे उभे राहिले.स्वत: साठी कधी वेळ न पाळता समाजासाठी वेळ दिला.स्वत:चे आजारपण, कुटुंबाचा खर्च,मुलाचा मृत्यू असे दु:ख सहन करीत ते चाळीस वर्षे समाजाच्या भल्यासाठी काम करीत आहेत.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. सुरेश वाघमारे यांनी दलित आत्मकथनाचा प्रवास कथन केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर,म. भि.चिटणीस यांनी आरंभी विद्यार्थ्यांना भित्तीपत्रके लिहायला लावून,त्याचे प्रदर्शन करुन खऱ्या अर्थाने दलित आत्मकथनाचा पाया घातला.दलित समाजाच्या व्यथा, वेदना, दुःख व अन्याय अत्याचाराला शब्दरूप दिले. श्रीहरी कांबळे हे दलित पँथर चळवळीचे संवेदनशील कार्यकर्ते असून अत्यंत जिव्हाळ्याने त्याने चाळीस वर्षे काम केले स्वतः बरोबरच त्यांनी कार्यकर्ते सांभाळले. श्रीहरी कांबळे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांवरच दलित समाज बाबासाहेबांच्या नंतर अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लढा देऊ शकला असे ते म्हणाले.

संघर्षपिटक या आत्मचरित्राच्या प्रकाशनानंतर श्रीहरी कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. आणि या आत्मचरित्र लेखन विषयाची भूमिका त्यांनी विषद केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवराज अंधोरीकर यांनी केले. सूत्रसंचालन शिवाजी गाडेकर यांनी केले.

या कार्यक्रमाला रामानुज रांदड, नगरसेवक सचिन गायकवाड, मोहन माने, रामानुज रांदड, चंद्रकांत चिकटे, डॉ. शार्दुल शिंदे, केशव कांबळे, कॉ.विश्वंभर भोसले, पत्रकार बाळ होळीकर, जी.जी. कांबळे, मोहन कांबळे, सुशील चिकटे, सतीश सुरवसे, बालाजी कांबळे, प्रा.अनंत लांडगे, संतोष वाघमारे, प्रवीण सोमठाणकर, अर्जून दळवी, मोहन कांबळे, अशोक कांबळे, देविदास कांबळे, लाला सुरवसे, ज्ञानोबा कांबळे, हरिष कांबळे,अशोक बनसोडे, राजेंद्र बनसोडे, त्र्यंबकराव बानाटे, अशोक बनसोडे, विजय गायकवाड, एन.डी.सोनकांबळे, जयद्रथ जाधव औसा, विनोद टेंकाळे, सतीश सुरवसे, प्रदीप कांबळे, सचिन हिंगे,विलास सूर्यवंशी, अरविंद कांबळे आदी मोठ्या प्रमाणात लातूर जिल्ह्यातील दलित पँथर व आर पी आय चे कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी विश्वजीत प्रतिष्ठानच्या वतीने अनेक समर्पित कार्यकर्त्यांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.

## व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने रुग्णांच्या समस्या सोडविण्यासाठी वैद्यकीय अधीक्षकाना दिले निवेदन



**लातूर/प्रतिनिधी :** विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ सचिन गरुड यांच्या दालनात रुग्णांच्या विविध समस्या बाबतीत सर्व विभागप्रमुखांसोबत बैठक घेण्यात आली

या बैठकीला व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन भाऊ मस्के मार्गदर्शक संतोष मांदळे रवी कुरील जिल्हाध्यक्ष शरद किनीकर विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, माधव कांबळे ,सह वैद्यकीय महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. या बैठकीमध्ये विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली यावेळी विनोदभाऊनी सर्व विभागप्रमुखांनी रुग्णांना चांगली सेवा द्यावी, नर्सिंग स्टाफ ने रुग्णासोबत, रुग्णांच्या नातेवाईकसोबत चांगले वर्तन ठेवावे, तसेच सुरक्षा रक्षकांनी रुग्णांच्या नातेवाईकांसोबत वाद घालू नयेत असे आवाहन केले.

यावेळी डॉ सचिन गरुड यांनी सर्व समस्यांचे निराकरण करण्यात येईल असे आश्वासन दिले. वेळोवेळी सर्व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात येतील असे सांगितले.

## लातूरमध्ये ७ जून रोजी ‘संडे ऑन सायकल’ मोहिमेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाद्वारे ‘खेलो इंडिया’ योजनेच्या ‘फिट इंडिया’ उपक्रमांतर्गत रविवार, ७ जून २०२६ रोजी लातूर शहरात ‘संडे ऑन सायकल’ या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांमध्ये तंदुरुस्ती व नियमित व्यायामाचे महत्त्व रुजवण्यासाठी तसेच लठ्ठपणाशी लढण्यासाठी आयोजित केलेल्या या सायकल रॅलीचा मार्ग जिल्हा क्रीडा संकुल येथून सुरू होऊन राजीव गांधी चौक, वाडा हॉटेल, पी.व्ही.आर. चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा जिल्हा क्रीडा संकुल असा निश्चित करण्यात आला आहे. तरी या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील सर्व क्रीडाप्रेमी, नागरिक, सायकलिंग क्लब, शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थी आणि खेळाडूंनी ७ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ७ वाजता मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि या उपक्रमासाठी https://fitindia.gov.in/world-bicycle-day या संकेतस्थळावर आपली नोंदणी करावी, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

## विजपुरवठा सूरूळीत करा अन्यथा महावितरण वर गाढव मोर्चा

## सम्राट मित्रमंडळाचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन

**अहमदपूर :** अहमदपूर शहरातील विस्कळीत झालेला वीजपुरवठा युध्द पातळीवर सूरूळीत करावा अन्यथा सम्राट मित्र मंडळाच्या वतीने महावितरण कार्यालयावर गाढव मोर्चा काढण्यात येईल असा ईशारा येईल सम्राट मित्रमंडळाच्या वतीने कार्यकारी अभियंता यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दिले आहे.



आज येथील सबस्टेशन येथे महावितरणचे अधिकारी आले असता एका शिष्टमंडळासह त्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. निवेदनात पूढे म्हटले आहे की,सध्या अहमदपूर शहरामध्ये गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून लाईटचा प्रचंड खेळखंडोबा झालेला आहे. अर्ध्या अर्ध्या तासाला विज गायप होत आहे. अनेकवेळा अर्धे अधिक शहर अंधारामध्ये रात्री राहते या लाईटच्या लपंडावामुळे पहिलेच दिवसभर वाढलेले तापमान त्यातून रात्री अप रात्री जाणारी लाईट यामुळे घरातील फॅन कुलर चालू करता येत नाहीत पर्यायाने लहान लहान मुले वृद्ध माणसे या सगळ्यांची प्रचंड मोठी अडचण होत आहे. या संबंधाने आपल्याकडे वारंवार फोनवरून निरोप देऊन सुद्धा कुठलीच कार्यवाही होत नाही त्यामुळे पुढील काळामध्ये अहमदपूर शहराचा वीजपुरवठा सुरळीत करावा अन्यथा आपल्या कार्यालयावर गाढव मोर्चा काढण्यात येईल.याची कृपया नोंद घ्यावी.

अहमदपूर शहरातील फ्युज कॉलचा फोन नंबर २४ तास चालू ठेवावा.नागरीकांनी कॉल केल्यास कॉल उचलण्याच्या सूचना संबंधितांना द्यावे., नागरिकांनी फ्युज कॉल ला रात्री अपरात्री कुठल्याही परिस्थितीत अखंडित पुरवठा वीज पुरवठ्यासाठी कॉल केला तर विभागाच्या वतीने आवश्यक ती उपायोजना तातडीने करावी., अहमदपूर सबस्टेशन येथे गेल्या अनेक दिवसांपासून जमीनीवर धूळखात असलेला १० चा ट्रान्स्फॉर्मर तातडीने चार्ज करावा., अहमदपूर शहरासाठी तातडीने स्वतंत्र शहर अभियंत्याची नेमणूक करावी., शहरात आवश्यक त्या ठिकाणी वाढत्या वीज मागणीची दखल घेवून जास्तीचा ट्रान्स्फॉर्मर बसवून द्यावे., शहरासाठी स्वतंत्र सबस्टेशन ची तातडीने मंजूरी करावी., दिवसभर लाईटचा येणे जाणे चालू असुन त्याचा नागरीकांना त्रास होत आहे., तरी अखंडित विज पूरवठा चालू करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना कराव्या., ऐक्सप्रेस फिडर विना अडथळा व्यवस्थित चालण्यासाठी आवश्यक ती उपायोजना करावी., अहमदपूर शहर पाणी पूरवठ्यासाठी अखंडित विज पूरवठा करावा. आदी मागण्याचा समावेश आहे.

या वरील मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी अन्यथा आपल्या कार्यालयावर दिनांक १५ जून रोजी गाढव मोर्चा काढण्यात येईल याला सर्वस्वी महावितरणचे अधिकारी जबाबदार असतील असा ईशारा देण्यात आला आहे. या वेळेस सम्राट मित्रमंडळाचे अध्यक्ष युवकनेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी,मौलाना आझाद विचारमंच चे अध्यक्ष मोहम्मद पठाण,शेख रहीमभाई,नौशाद सय्यद, उमरखान पठाण,आकाश पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## मजगे नगर येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील मजगे नगर परिसरामध्ये अधिक मासाच्या निमित्ताने ४ जून ते १० जून २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.



यामध्ये पहाटे ५ ते ६ काकडा आरती, सकाळी ११ ते १२ विष्णूसहस्त्रनाम्, दुपारी १२ ते ०२ भजनी मंडळाचा कार्यक्रम व दुपारी ०२ ते ०५ या वेळेत ह.भ.प.मंगलताई लोमटे कळंबकर यांचा श्रीमद् भागवत कथा व हरिपाठाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच अहमदनगर येथील संगित गायक सतीश खवके, शांत सायझर वादक दिनेश काळे सोनपेठकर, तबला वादक कन्हेया काळे लातूरकर यांची साथ राहणार आहे. तसेच १० जून २०२६ रोजी सकाळी १० ते ०१ पर्यंत श्रीमद् भागवत कथेचे वाचन व कथा सांगतेनंतर दुपारी ०१ ते आपल्या आगमनापर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्यामुळे या कार्यक्रमाला मजगे नगर परिसरातील भावी-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कव्हेकर परिवाराच्यावतीने करण्यात आलेले आहे.

# हेल्मेटचा अभाव आणि बेफिकीर, माजी सरपंचांसह दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू; दोन दिवसात तीन जणांचा अपघाती मृत्यू

- रस्ते सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याने लातूर जिल्ह्यात पुन्हा तीन कुटुंबांवर दु:खाचा डोंगर
- नागरिकांनी हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करण्याचे पोलिसांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेटचा वापर आणि सुरक्षित वाहनचालना याबाबत पोलीस प्रशासनामार्फत सातत्याने जनजागृती करण्यात येत असतानाही निष्काळजीपणा आणि सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे अपघाती मृत्यूच्या घटना चिंताजनकरीत्या समोर येत आहेत. दिनांक ०२ व ०३ जून २०२६ रोजी घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये एक माजी सरपंच आणि दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांसह एकूण तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.



चाकुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक ०२ जून २०२६ रोजी सायंकाळी नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्गावरील चौकात झालेल्या अपघातात पंडीत नामदेव पवार (वय ५७ वर्षे), रा. शंकरनगर तांडा, ता. चाकुर यांचा मृत्यू झाला. फिर्यादी वैजनाथ पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार एमएच-२४-बीडब्ल्यू-०३५७ क्रमांकाच्या वाहनाच्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांच्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या पंडीत पवार यांचा मृत्यू झाला. ते आपल्या परिसरातील माजी सरपंच म्हणून परिचित होते.

तसेच आज सकाळी लातूर शहरातील पीव्हीआर चौक परिसरात आणखी एक दुर्दैवी अपघात घडला. सीईटी परीक्षेच्या वर्गासाठी जात असताना दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांचा त्यांचे ताब्यातील मोटारसायकल व ट्रक यांच्यात झालेल्या अपघातात मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार अल्पवयीन मुलाने पालकांना न सांगता दुचाकी घेतली होती. वेगाने जात असताना झालेल्या या अपघातात दोन्ही विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागला.

दोन्ही घटनांमध्ये एक समान बाब प्रकर्षाने समोर आली असून ती म्हणजे सुरक्षाविषयक नियमांकडे दुर्लक्ष. प्राथमिक तपासात संबंधितांनी हेल्मेटचा वापर केला नसल्याचे समोर आले आहे. रस्ते अपघातांमध्ये डोक्याला होणारी गंभीर दुखापत ही मृत्यूचे प्रमुख कारण ठरत असल्याचे अनेक घटनांतून स्पष्ट झाले आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, दुचाकी चालविताना चालक व मागील आसनावरील व्यक्तीने हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक आहे. चारचाकी वाहनांमध्ये सीटबेल्टचा वापर करावा. वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवावे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे आणि मद्यपान करून वाहन चालविणे टाळावे.

तसेच पालकांनी अल्पवयीन मुलांच्या हातात दुचाकी अथवा चारचाकी वाहनांची चावी देऊ नये. अल्पवयीन वाहनचालना ही केवळ कायद्याचा भंग नसून ती त्यांच्या आणि इतरांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण करू शकते. क्षणिक बेपर्वाईमुळे संपूर्ण कुटुंबाला आयुष्यभराचे दुःख सहन करावे लागू शकते.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ‘‘हेल्मेट आणि सीटबेल्ट हे दंड टाळण्यासाठी नव्हे तर जीव वाचविण्यासाठी आहेत. प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे पालन करणे ही सामाजिक जबाबदारी म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे.’’

## संपादकीय...

### गुप्तचर यंत्रणेच्या सतर्कतेमुळे दहशतवादी हल्ल्याचे संकट टळले

पाकिस्तानची गुप्तहेर संस्था इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) आणि कुख्यात दहशतवादी दाऊद इब्राहिम याच्या टोळीशी संबंधित नऊ हस्तकांना दिल्ली पोलिसांनी पकडले आणि दिल्ली व मुंबईवर मोठा दहशतवादी हल्ला करण्याचा कट उधळला गेला. दिल्ली पोलिसांची दक्षता व सुरक्षा दलाच्या गुप्तचर यंत्रणेची सतर्कता यामुळे देशावर होऊ घातलेल्या दहशतवादी हल्ल्याचे संकट टळले. केवळ मुंबई, दिल्लीतच नव्हे, देशातील अन्य शहरांतील महत्त्वाच्या ठिकाणांवरही दहशतवादी हल्ले करण्याची योजना होती. अणू प्रकल्प, ऊर्जा प्रकल्प, विमानतळ, रेल्वेस्थानके आदींवर दहशतवादी हल्ले झाले असते, तर देशात मोठा हाहाकार उडाला असता. अशा हल्ल्यात किती लोकांचे बळी गेले असते, याची कल्पनाही करणे कठीण आहे. देशावरील दहशतवादी हल्ले रोखण्यात पोलिस व सुरक्षा दलाला यश मिळाले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. देशात मुंबई व दिल्ली ही दोन्ही महानगरे अत्यंत महत्त्वाची आहेत. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहेच शिवाय देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईची लोकसंख्या दीड कोटीच्या घरात, तर दिल्लीची त्याहीपेक्षा जास्त आहे. दिल्ली ही देशाची राजधानी आहे. या दोन्ही महानगरांत वित्तीय संस्था, राष्ट्रीय बँका, उद्योग समूहांची कार्यालये आहेत. दिल्लीत संसद भवन, दूतावास व राजकीय पक्षांची मुख्यालये आहेत. या दोन महानगरांत यापूर्वी अनेकदा दहशवादी हल्ले झाले आहेत. शेकडो निरापराध लोकांचे अशा हल्ल्यात बळी पडले आहेत. संसदेवर झालेला दहशतवादी हल्ला व मुंबईवर कसाब व त्याच्या टोळीने समुद्रमार्गे येऊन केलेला दहशतवादी हल्ला या घटनांनी जगाला हादरा बसला होता. या दोन्ही हल्ल्यांत सर्व दहशतवादी हल्लेखोर ठार झाले. एकाला फाशी झाली; पण मुंबई व दिल्ली ही महानगरे आजही आयएसआयच्या रडारवर आहेत, हे या निमित्ताने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. दिल्ली व मुंबईवर दहशतवाद्यांचे आत्मघाती हल्ले होणार असल्याची माहिती दिल्ली पोलिसांना मिळाली. बॉम्बस्फोट घडवून व गोळीबार करून अशांतता व घबराट माजविण्याचा मोठा कट आखला गेला होता. राजकीय व अर्थव्यवस्थेचा मोठा आधार असलेल्या व देशाला अर्थशक्ती देणार्या या दोन महानगरांत दहशतादी हल्ले केल्यानंतर देशाच्या स्थैर्याला धोका पोहोचू शकतो, अशा पद्धतीने या हल्ल्यांची आखणी करण्यात आली होती. पंधरा दिवसांपूर्वीच पुणे आणि झारखंडमधील साहिबगंज येथून दोन गुन्हेगार तरुणांना पोलिसांनी अटक केली होती. शार्प शूटर म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या संपर्कात आयएसआयने आखलेल्या कटातील काही दहशतवादी होते, असे चौकशीत आढळून आले. देशात विविध ठिकाणी दहशतवादी हल्ले करण्यासाठी तरुणांची भरती करण्याचे कामही चालू होते. हल्ले घडविल्यानंतर लाखो रुपयांची मोठी रक्कम देण्याचे आमिष त्यांना दाखवले जात होते. दहशतवादी टोळीतील नऊ जणांना अटक केल्यानंतर त्यांच्या मोबाईलमध्ये मुंबई-दिल्लीतील अनेक महत्त्वाच्या व संवेदनशील जागांचे फोटो दिल्ली पोलिसांना आढळून आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताची चौफेर प्रगती चालू आहे. जगातील टॉप फाईव्ह अर्थव्यवस्थांमध्ये देश येत असून आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने देशाची वाटचाल चालू आहे. अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धामुळे जगात अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. इंधनाचे दर वाढत आहेत; पण तुलनेने भारतात जनजीवन सुरळीत आहे. नेमके हेच पाकिस्तानला खूपत असावे. भारतात अशांतता व अस्थिरता निर्माण व्हावी, यासाठी आयएसआय गेली अनेक वर्षे कारवाया करीत आहे. दहशतवाद्यांना प्रशिक्षण देऊन भारतात घुसवून हल्ले, रक्तपात घडविण्याचे कारस्थान चालू आहे. दिल्ली पोलिसांच्या जागरूकतेमुळे हा कट उघडकीस आला व मुंबई व दिल्लीवर हल्ले होण्यापूर्वीच नऊ दहशतवादी जेरबंद केले गेले. पुलवामा व पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानातील दहशतवादी केंद्रावर एअर स्ट्राईक करून तेथील असंख्य अड्डे उद्ध्वस्त केले. 'ऑपरेशन सिंदूर'मधून पाकिस्तानला धडकी भरेल अशी भारतीय सेनेने कारवाई केली; पण त्यानंतरही भारतात घुसून, दहशतवादी हल्ले करून अस्थिरता व अशांतता घडविण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न चालूच आहे. मुंबई, दिल्ली अशा महानगरांत पाकिस्तानी व बांगला देशी घुसखोर वर्षानुवर्षे राहत आहेत. देशात नेमके किती घुसखोर आहे, याची निश्र्चित आकडेवारी कोणी सांगू शकत नाही; मात्र मुंबई, दिल्ली, कोलकाता या महानगरांत तसेच पश्र्चिम बंगाल, आसाम व इशान्येकडील राज्यांत घुसखोरांची संख्या मोठी आहे. आसाम व पश्र्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार आल्यापासून तेथील घुसखोरांमध्ये घबराट पसरली आहे. आता आपल्याला भारतात संरक्षण मिळणार नाही, याची त्यांना खात्री पटली आहे. केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार आल्यापासून बेकायदा बांधकामे, सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे, अनधिकृत झोपडपट्ट्या हटविण्याचे काम देशभर चालू आहे. उत्तर प्रदेश व पश्र्चिम बंगालमध्ये तर बुलडोझर चालवून बेकायदा बांधकामे पाडली जात आहेत. मुंबईत रेल्वे रुळालगत असलेल्या झोपडपट्ट्यांमध्येही हे गुन्हेगार वर्षानुवर्षे आश्रय घेत आहेत. मुंबईच्या पश्र्चिम उपनगरातील वांद्रे रेल्वेस्थानकात रेल्वे रुळाला लागून मोठी झोपडपट्टी होती. गरीबनगर म्हणून ओळखल्या जाणार्या महाप्रचंड बेकायदा झोपडपट्टीला काँग्रेसच्या काळात कोणाची हात लावण्याची हिम्मत झाली नव्हती. आता केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आहे. बेकायदा बांधकामे व घुसखोरांच्या विरोधात कठोर कारवाई ही भाजपची भूमिका आहे. गरीबनगर हे गुन्हेगारांचे मोठे केंद्र बनले होते. गरीबनगर साफ झाले म्हणून त्याचा बदला घेण्यासाठी मुंबईत दहशतवादी हल्ला करण्याचा कट रचला जात होता, अशी माहिती मुंबई पोलिसांना तपासात मिळाली आहे. देशाच्या सुरक्षेसाठी दहशतवादाविरोधातील लढा सातत्याने आणि अधिक प्रभावीपणे सुरू ठेवणे गरजेचे आहे. त्याचवेळी सुरक्षा यंत्रणांची सतर्कता, नागरिकांचे सहकार्य आणि कायद्याची कठोर अंमलबजावणी यांच्याद्वारेच मुंबई, दिल्लीसारख्या महत्त्वाच्या शहरांचे सुरक्षित आणि स्थिर भविष्य सुनिश्र्चित करता येईल.

# नवी दिल्लीत येथे पत्रकार : स्वर्गीय श्रीकांत वर्मा यांच्या ४० व्या पुण्यतिथीनिमित्त भव्य स्मृती सोहळ्याचे आयोजन

## पत्रकारिता हा केवळ व्यवसाय नसून ती लोकजागृतीचे माध्यम आहे, हे श्रीकांत वर्मा यांनी सिद्ध केले होते : श्रीमती आदिती राजपूत





के. रवी (दादा)

**नवी दिल्ली:** देशातील प्रख्यात साहित्यिक, कवी, पत्रकार आणि जनचिंतक स्वर्गीय: श्रीकांत वर्मा यांच्या ४० व्या पुण्यतिथीनिमित्त नवी दिल्लीतील रफी मार्ग येथील कॉन्स्टिट्यूशन क्लबच्या मावलंकर हॉलमध्ये 'विश्व हिंदी परिषद' आणि 'श्रीकांत वर्मा ट्रस्ट' यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्रीकांत वर्मा स्मृती समारोह' व 'श्रीकांत वर्मा स्मरांजली' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात साहित्यिक चर्चा, काव्यवाचन, स्मृती चर्चा आणि पुरस्कार वितरणाचा एक सुंदर समन्वय पाहायला मिळाला. स्वर्गीय: श्रीकांत वर्मा यांचे साहित्यिक, वैचारिक, पत्रकारिता आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि हिंदी साहित्याची समृद्ध परंपरा जिवंत ठेवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात स्व. श्रीकांत वर्मा यांच्या जीवनप्रवास, साहित्यिक योगदान, पत्रकारिता आणि राजकीय क्षेत्रातील कामगिरीच्या परिचयाने झाली. यानंतर निमंत्रित पाहुणे, ज्येष्ठ साहित्यिक आणि वर्मा कुटुंबातील सदस्यांनी दीपप्रज्वलन करून स्वर्गीय . श्रीकांत वर्मा यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. विश्व हिंदी परिषदेचे () राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. बिपिन कुमार यांनी उपस्थितांचे स्वागत करताना स्व. श्रीकांत वर्मा यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव केला.

ते म्हणाले की, श्रीकांत वर्मा यांनी आपल्या काळातील वेदना, समाजाचे दुःख आणि सत्तेची शांतता आपल्या कवितांमधून मांडली. सत्तेच्या जवळ राहूनही त्यांनी सत्तेला प्रश्न विचारण्याचे धाडस दाखवले. डॉ. बिपिन कुमार यांनी स्वर्गीय : श्रीकांत वर्मा यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, अशी मागणी केली आणि या संदर्भात भारत सरकारला अधिकृत निवेदन सोपवले जाईल, असे सांगितले. या प्रसंगी डॉ. अभिषेक वर्मा यांनी श्रीकांत वर्मा ट्रस्टच्या वतीने उपस्थित साहित्यिक आणि मान्यवरांना स्वर्गीय . श्रीकांत वर्मा यांचे प्रसिद्ध पुस्तक 'मगध' आणि मोती माळ देऊन सन्मानित केले. कार्यक्रमात श्रीकांत वर्मा यांच्या साहित्यिक प्रवास, सर्जनशील व्यक्तिमत्त्व आणि वैचारिक वारशावर आधारित चार मिनिटांची लघुपट (वृत्तचित्र) दाखवण्यात आली. डॉ. अभिषेक वर्मा यांनी आपल्या वडिलांच्या आठवणींना उजाळा देताना भावूक होऊन सांगितले की, स्वर्गीय. श्रीकांत वर्मा हे कर्करोगासारख्या (कॅन्सर) गंभीर आजाराशी लढतानाही शेवटच्या क्षणापर्यंत संघर्ष करत राहिले. त्यांनी जाहीर केले की, १८ सप्टेंबर रोजी श्रीकांत वर्मा यांच्या जयंतीनिमित्त साहित्य, पत्रकारिता, कला आणि युवा लेखन क्षेत्रात विशेष पुरस्कार प्रदान केले जातील. यामध्ये शिखर सन्मान (साहित्य) २१ लाख रुपये, पत्रकारिता पुरस्कार ५ लाख रुपये, कला पुरस्कार २ लाख रुपये आणि युवा साहित्यिक पुरस्कार (४५ वर्षांखालील लेखकांसाठी) २ लाख रुपये दिले जातील. ते पुढे म्हणाले की, 'मगध' ही हिंदी साहित्यातील एक अद्वितीय कृती आहे, ज्यामध्ये सामाजिक, राजकीय आणि मानवी वास्तव अत्यंत सखोलतेने रेखाटले गेले आहे. श्रीकांत वर्मा ट्रस्टच्या व्यवस्थापकीय विश्वस्त एन्का वर्मा यांनी भावूक स्वरात सांगितले की, श्रीकांत वर्मा हे एक महान आणि अत्यंत संवेदनशील कवी होते. त्या म्हणाल्या की, जरी त्या त्यांना वैयक्तिकरित्या कधी भेटू शकल्या नाहीत, तरी त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून त्या आजही त्यांच्याकडून खूप काही शिकतात. त्यांची संवेदनशीलता आणि शब्दांची खोली आजही प्रेरणेचा स्रोत आहे.

मुख्य अतिथी आणि ज्येष्ठ साहित्यिक श्री. अशोक वाजपेयी यांनी श्रीकांत वर्मा यांच्या कवितांवर सविस्तर चर्चा करताना सांगितले की, ते एक लढाऊ कवी होते. त्यांनी आपले वैचारिक आणि काव्यात्मक बाणे कधीही सोडले नाहीत. २० व्या शतकातील अंधार आणि समस्या जवळून ओळखून त्याला आपल्या कवितेत स्थान देणारे श्रीकांत वर्मा हे हिंदीतील अत्यंत महत्त्वाचे कवी होते, असे त्यांनी नमूद केले. प्रख्यात साहित्यिक आणि कला समीक्षक श्री. विनोद भारद्वाज यांनी 'कला आणि आलोचना' या विषयावर बोलताना सांगितले की, श्रीकांत वर्मा यांची विचारसरणी त्यांच्या काळातील इतर साहित्यिकांपेक्षा वेगळी होती.

जग बदलते, पण आठवणी कायम राहतात. 'जनसत्ता'चे माजी संपादक श्री. ओम थानवी यांनी 'श्रीकांत वर्मा यांचे बौद्धिक तेवर' या विषयावर आपले मत मांडताना सांगितले की, श्रीकांत जी हे मोठे साहित्यिक आणि मोठे पत्रकार होते. 'दिनमान'च्या पत्रकारितेची आठवण काढताना श्रीकांत वर्मा यांचे स्मरण करणे अनिवार्य ठरते.

साहित्यिक पत्रकारितेत सक्रिय भूमिका बजावत असलेल्या त्या सुवर्णकाळाचे ते प्रतिनिधित्व करत होते. कला, संस्कृती, चित्रपट आणि रंगभूमी समीक्षक श्री. रवींद्र त्रिपाठी यांनी ''पत्रकारिता आणि श्रीकांत वर्मा'' या विषयावर बोलताना सांगितले की, पत्रकारिता हे समाजातील घडामोडी समजून घेण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे आणि पत्रकारिता व आधुनिक साहित्याचा इतिहास एकमेकांशी जोडलेला आहे. ज्येष्ठ पत्रकार श्रीमती . आदिती राजपूत यांनी ''सध्याची पत्रकारिता आणि श्रीकांत वर्मा'' या विषयावर बोलताना सांगितले की, पत्रकारिता हा केवळ व्यवसाय नसून ती लोकजागृतीचे माध्यम आहे, हे श्रीकांत वर्मा यांनी सिद्ध केले होते. पत्रकारिता आधी एक ध्येय (मिशन) होती, नंतर ती पेशा (प्रोफेशन) बनली आणि आज ती बाजाराच्या दबावाखाली प्रभावित होत आहे. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ प्रा. पूरनचंद टंडन यांनी 'कथा आणि साहित्य' या विषयावर बोलताना सांगितले की, श्रीकांत वर्मा यांच्या गद्यात त्यांची संवेदनशीलता स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या साहित्यात युगबोध, कालबोध, सामाजिक अस्वस्थता आणि राष्ट्रीय चेतना स्पष्टपणे जाणवते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रसिद्ध समीक्षक प्रा. अरविंद त्रिपाठी यांनी आभार प्रदर्शन केले. या सोहळ्याला श्री. ओम थानवी, डॉ. पूरनचंद टंडन, श्री. रवींद्र त्रिपाठी, डॉ. बिपिन कुमार, श्री. अशोक वाजपेयी, श्री. विनोद भारद्वाज, श्रीमती आदिती राजपूत, प्रा. अरविंद त्रिपाठी, अशोक श्रीवास्तव (डीडी न्यूज) यांच्यासह अनेक साहित्यिक, पत्रकार, बुद्धिजीवी आणि कलाकार उपस्थित होते. स्वर्गीय श्रीकांत वर्मा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन मिनिटांचे मौन पाळून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा सोहळा केवळ एक श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम नव्हता, तर हिंदी साहित्य, पत्रकारिता आणि वैचारिक चर्चेच्या क्षेत्रात स्वर्गीय श्रीकांत वर्मा यांच्या अमूल्य योगदानाचा पुनरुच्चार करण्याचा एक सार्थ प्रयत्न ठरला.

# निष्पाप बालपणावर आक्रमकतेची सावली

दरवर्षी ४ जून हा दिवस जगभरात ''आक्रमकतेचे बळी ठरलेल्या निष्पाप मुलांचा आंतरराष्ट्रीय दिन'' म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक औपचारिक नोंद नाही, तर मानवी संवेदनशीलतेला जागृत करणारा, जगाच्या विवेकाला प्रश्न विचारणारा आणि बालहक्कांच्या संरक्षणासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. जगात जेव्हा जेव्हा युद्धे, दहशतवादी हल्ले, सशस्त्र संघर्ष, जातीय हिंसाचार, धार्मिक संघर्ष किंवा कोणत्याही प्रकारची आक्रमकता निर्माण होते, तेव्हा त्याचे सर्वाधिक गंभीर परिणाम निरपराध मुलांवर होतात. ज्या वयात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि रंगीत स्वप्ने असावीत, त्या वयात अनेक मुलांच्या हातात भीती, असुरक्षितता आणि वेदना येतात. त्यांचे बालपण हिरावले जाते, शिक्षण खंडित होते, कुटुंबे तुटतात आणि भविष्य अंधकारमय बनते. या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्यासाठी आणि जगभरातील बालकांच्या संरक्षणासाठी जागतिक स्तरावर जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.

या आंतरराष्ट्रीय दिनाची सुरुवात १९८२ मध्ये झाली. त्या काळात मध्यपूर्वेतील संघर्षांमध्ये विशेषतः लेबनॉन आणि पॅलेस्टाईन भागातील अनेक निष्पाप मुलांचा मृत्यू झाला होता. युद्धाच्या भयावहतेमुळे हजारो बालके जखमी झाली, बेघर झाली आणि मानसिक आघाताची शिकार झाली. या घटनांनी संपूर्ण जगाला हादरवून सोडले. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ४ जून हा दिवस आक्रमकतेचे बळी ठरलेल्या मुलांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या संरक्षणासाठी जागतिक प्रयत्नांना बळ देण्यासाठी घोषित केला. कालांतराने या दिवसाचा आशय अधिक व्यापक झाला. आज हा दिवस केवळ युद्धग्रस्त मुलांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर कोणत्याही प्रकारच्या हिंसा, अत्याचार, शोषण, दडपशाही आणि आक्रमकतेचा बळी ठरलेल्या सर्व मुलांच्या संरक्षणासाठी समर्पित आहे.

बालपण हा मानवी जीवनाचा सर्वात नाजूक आणि महत्त्वाचा टप्पा असतो. याच काळात मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते, त्यांची मानसिकता विकसित होत असते आणि त्यांच्या भविष्याचा पाया रचला जात असतो. प्रत्येक मुलाला प्रेम, माया, संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. परंतु वास्तवात जगातील लाखो मुले या मूलभूत अधिकारांपासून वंचित आहेत. संघर्ष, हिंसा आणि आक्रमकतेमुळे त्यांचे बालपण उद्ध्वस्त होत आहे. जगात घडणाऱ्या प्रत्येक युद्धाचा आणि प्रत्येक हिंसक घटनेचा सर्वात मोठा फटका मुलांनाच बसतो.

युद्ध हा मानवतेसाठी सर्वात मोठा शाप मानला जातो. युद्धात केवळ सैनिकच मरत नाहीत, तर निरपराध नागरिकांचेदेखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामध्ये मुलांचे प्रमाण लक्षणीय असते. युद्धामुळे घरे उद्ध्वस्त होतात, शाळा बंद पडतात, रुग्णालये नष्ट होतात आणि संपूर्ण सामाजिक व्यवस्था विस्कळीत होते. अशा परिस्थितीत मुलांना अन्न, पाणी, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. अनेक वेळा त्यांना आपले घर, गाव आणि देश सोडून निर्वासित म्हणून जगावे लागते.

युद्धग्रस्त प्रदेशांतील मुलांचे जीवन अत्यंत कठीण असते. सततचा गोळीबार, बॉम्बस्फोट, हवाई हल्ले आणि मृत्यूचे वातावरण त्यांच्या मनात कायमस्वरूपी भीती निर्माण करते. अनेक मुले आपल्या डोळ्यांसमोर आई-वडील, भाऊ-बहिण किंवा नातेवाईक गमावतात. काही मुले अनाथ होतात, तर काही कुटुंबापासून वेगळी होतात. अशा परिस्थितीत त्यांच्यावर होणारा मानसिक परिणाम अत्यंत गंभीर असतो. मानसशास्त्रज्ञांच्या मते, बालपणी अनुभवलेले युद्ध आणि हिंसाचार यांचे परिणाम व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर दिसून येतात.

युद्धामुळे शिक्षणावर होणारा परिणामही गंभीर असतो. शाळा उद्ध्वस्त झाल्यामुळे किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद राहिल्यामुळे लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहतात. शिक्षण ही मुलांच्या विकासाची सर्वात प्रभावी गुरुकिल्ली आहे. शिक्षणामुळेच त्यांना आत्मविश्वास, कौशल्ये आणि उज्ज्वल भविष्याची दिशा मिळते. परंतु संघर्षामुळे शिक्षण खंडित झाल्यास त्यांच्या जीवनातील अनेक संधी कायमच्या नष्ट होतात. अशा मुलांपैकी अनेकजण पुन्हा कधीही शाळेत जाऊ शकत नाहीत.

आक्रमकतेचा परिणाम केवळ युद्धापुरता मर्यादित नसतो. घरगुती हिंसा ही देखील मुलांवरील आक्रमकतेचे एक गंभीर रूप आहे. अनेक मुले स्वतः च्या घरात शारीरिक, मानसिक किंवा भावनिक अत्याचार सहन करतात. पालकांमधील सततचे वाद, व्यसनाधीनता, आर्थिक तणाव आणि कौटुंबिक कलह यांचा परिणाम मुलांच्या मानसिक आरोग्यावर होतो. घर हे मुलांसाठी सुरक्षिततेचे ठिकाण असले पाहिजे; परंतु जेव्हा घरच भीतीचे केंद्र बनते, तेव्हा मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर गंभीर परिणाम होतो.

बालकांवरील लैंगिक अत्याचार ही आधुनिक समाजातील अत्यंत गंभीर समस्या आहे. जगभरात लाखो मुले अशा अत्याचारांची शिकार होतात. या अत्याचारांमुळे त्यांच्या शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आणि भावनिक आरोग्यावरही खोल परिणाम होतो. अनेक वेळा पीडित मुले भीतीमुळे किंवा सामाजिक दबावामुळे आपले अनुभव व्यक्त करू शकत नाहीत. परिणामी त्यांचे दुःख अधिक वाढते. बालकांच्या सुरक्षिततेसाठी कुटुंब, शाळा, समाज आणि शासन या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

बालमजुरी हे देखील मुलांच्या हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. जगातील अनेक भागांमध्ये अजूनही लाखो मुले काम करण्यास भाग पाडली जातात. गरिबी, बेरोजगारी आणि सामाजिक विषमता यांमुळे कुटुंबांना आपल्या मुलांना शिक्षणाऐवजी कामावर पाठवावे लागते. कारखाने, खाणी, बांधकाम क्षेत्र, शेती आणि घरगुती कामांमध्ये गुंतलेली ही मुले अनेकदा अमानुष परिस्थितीत काम करतात. त्यांचे शिक्षण थांबते, आरोग्य बिघडते आणि बालपण हिरावले जाते.

मानवतस्करी ही मुलांसाठी आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक मुलांना फसवून, अपहरण करून किंवा गरिबीचा फायदा घेऊन तस्करीच्या जाळ्यात अडकवले जाते. त्यांचा वापर सक्तीच्या मजुरीसाठी, लैंगिक शोषणासाठी, भीक मागण्यासाठी किंवा गुन्हेगारी कारवायांसाठी केला जातो. अशा मुलांचे जीवन पूर्णपणे उद्ध्वस्त होते. त्यांना स्वातंत्र्य, शिक्षण आणि सन्मानाने जगण्याच्या संधींपासून वंचित राहावे लागते.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मुलांसमोर नवीन प्रकारची आव्हाने उभी राहिली आहेत. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे संवाद आणि ज्ञानाची नवी क्षितिजे खुली झाली असली तरी सायबर बुलिंग, ऑनलाइन छळ, डिजिटल फसवणूक आणि इंटरनेटद्वारे होणारे शोषण या समस्या वाढल्या आहेत. अनेक मुले सोशल मीडियावर अपमानास्पद संदेश, धमक्या किंवा मानसिक छळाला सामोरे जातात. या प्रकारच्या अनुभवांचा त्यांच्या आत्मविश्वासावर आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

संघर्ष आणि हिंसाचारामुळे निर्माण होणाऱ्या निर्वासितांच्या समस्येत मुलांचे प्रमाण खूप मोठे आहे. जेव्हा कुटुंबांना आपले घर सोडून सुरक्षिततेसाठी दुसरीकडे जावे लागते, तेव्हा मुलांचे जीवन पूर्णपणे बदलून जाते. त्यांना नवीन वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते. अनेक वेळा त्यांच्याकडे अन्न, पाणी, निवारा आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसतात. निर्वासित छावण्यांमध्ये राहणाऱ्या मुलांना अनेक सामाजिक आणि मानसिक अडचणींना सामोरे जावे लागते.

बालकांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. संयुक्त राष्ट्रांनी बालहक्कांच्या संरक्षणासाठी विविध करार आणि धोरणे स्वीकारली आहेत. बालकांना जीवन, शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि विकासाचा अधिकार आहे, ही संकल्पना आज जागतिक स्तरावर मान्य झाली आहे. तरीही अनेक देशांमध्ये या हक्कांची अंमलबजावणी अपुरी आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि प्रभावी धोरणांची आवश्यकता कायम आहे.

बालकांच्या संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था संघर्षग्रस्त आणि अत्याचारग्रस्त मुलांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. शिक्षण, पोषण, आरोग्यसेवा, मानसिक आधार आणि पुनर्वसन कार्यक्रमांच्या माध्यमातून लाखो मुलांना नवजीवन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, समस्या इतकी व्यापक आहे की केवळ संस्थांचे प्रयत्न पुरेसे नाहीत. संपूर्ण समाजाने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

भारतातही बालसंरक्षणासाठी विविध कायदे आणि योजना अस्तित्वात आहेत. बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, शिक्षणाचा अधिकार, लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण आणि बालहक्क संवर्धन यांसाठी अनेक कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मुलांच्या कल्याणासाठी अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत. तरीही सामाजिक विषमता, गरिबी, अशिक्षण आणि जागरूकतेचा अभाव यांमुळे अनेक आव्हाने कायम आहेत.

बालसंरक्षणामध्ये कुटुंबाची भूमिका सर्वात महत्त्वाची असते. मुलांना प्रेम, विश्वास आणि सुरक्षिततेचे वातावरण मिळणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांशी नियमित संवाद साधला पाहिजे, त्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत आणि त्यांना कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराविरोधात बोलण्याचे धैर्य दिले पाहिजे. मुलांच्या मनातील भीती, ताण किंवा अस्वस्थता वेळेवर ओळखणे आणि त्यांना योग्य आधार देणे अत्यंत आवश्यक आहे.

शाळा आणि शिक्षक यांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. शाळांनी सुरक्षित, समावेशक आणि संवेदनशील वातावरण निर्माण केले पाहिजे. विद्यार्थ्यांना मानवता, शांतता, सहिष्णुता आणि बालहक्क यांविषयी शिक्षण दिले पाहिजे. शाळांमध्ये समुपदेशन सेवा, तक्रार निवारण यंत्रणा आणि बालसंरक्षण धोरणे प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

प्रसारमाध्यमे समाजात जागरूकता निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहेत. बालकांवरील अत्याचारांच्या घटनांविषयी संवेदनशील आणि जबाबदार वृत्तांकन करून समाजाला जागृत करता येते. तसेच बालसंरक्षणाविषयी सकारात्मक संदेश देऊन लोकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करता येते. माध्यमांनी मुलांच्या गोपनीयतेचे संरक्षण करताना त्यांच्या सन्मानाचे जतन करणेही तितकेच आवश्यक आहे.

आक्रमकतेचे बळी ठरलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नसते. त्यांना भावनिक आधार, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि सामाजिक स्वीकाराची आवश्यकता असते. कला, संगीत, क्रीडा, साहित्य आणि विविध सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करता येतो. त्यांना पुन्हा सामान्य जीवनाकडे आणण्यासाठी समाजाने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे.

शांतता, सहिष्णुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मिती ही मुलांच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक आहे. जगातील कोणत्याही कोपऱ्यातील हिंसा आणि संघर्षाचा परिणाम शेवटी निष्पाप मुलांवर होतो. त्यामुळे युद्धाऐवजी संवाद, द्वेषाऐवजी सहकार्य आणि हिंसेऐवजी मानवतेचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

४ जून रोजी साजरा होणारा 'आक्रमकतेचे बळी ठरलेल्या निष्पाप मुलांचा आंतरराष्ट्रीय दिन' आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे संरक्षण ही केवळ कायद्याची किंवा शासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक मुलाला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि आनंदी बालपण मिळाले पाहिजे. त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जपणे, त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य कायम ठेवणे आणि त्यांना भीतीमुक्त वातावरण देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

आजच्या या निमित्ताने आपण असा संकल्प करूया की कोणत्याही मुलाला हिंसा, शोषण किंवा आक्रमकतेचे बळी ठरावे लागणार नाही. प्रत्येक बालकाला शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि विकासाच्या समान संधी मिळतील. कारण मुलांचे बालपण सुरक्षित असेल तरच मानवतेचे भविष्य सुरक्षित राहील. निष्पाप मुलांचे संरक्षण म्हणजे केवळ एका पिढीचे संरक्षण नाही, तर संपूर्ण जगाच्या उद्याचे संरक्षण आहे. म्हणूनच या आंतरराष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून बालहक्कांच्या रक्षणासाठी आणि हिंसामुक्त, न्याय्य व संवेदनशील समाजनिर्मितीसाठी प्रत्येकाने आपले योगदान देणे हीच काळाची खरी गरज आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**

**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## विविध वृत्त...

### कपालेश्वर मंदिरासमोरील वाड्याची भिंत कोसळून एक भाविक गंभीर जखमी

**नाशिक/प्रतिनिधी :** पहिल्याच पावसाच्या तडाख्यात कपालेश्वर मंदिर परिसरातील 'बिवलकर वाडा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जुन्या वाड्याची भिंत कोसळली, तसेच छताचे पत्रेही उडून गेले. या दुर्घटनेमुळे परिसरात उपस्थित असलेल्या अनेक भाविकांना दुखापत झाली असून, एका भाविकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेमुळे महापालिकेच्या कारभाराविरुद्ध भाविक आणि नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

सदरील वाड्याची मिळकत ही 'संस्थान श्री कपालेश्वर महादेव मंदिर' या संस्थेने खरेदी केलेली आहे. या मिळकतीमधील अर्धा भाग अत्यंत धोकादायक झाला असल्याने तो उतरवून घेण्याबाबत महापालिकेने यापूर्वीच नोटीस बजावली आहे, तर उर्वरित अर्ध्या भागात अनधिकृत बांधकाम असून त्यावर महापालिकेच्या वतीने कारवाई प्रलंबित आहे.

या संपूर्ण जागेबाबत आणि तिथल्या धोकादायक बांधकामाविषयी संस्थानने वेळोवेळी महानगरपालिकेशी लेखी पत्रव्यवहार केला होता. मात्र, महापालिकेने यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली नाही. प्रशासनाच्या याच ढिसाळ आणि बेफिकीर कारभारामुळे अखेर हा अनर्थ घडला.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरातील अशा धोकादायक बांधकामांमुळे भाविकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला असून, भविष्यात घडणाऱ्या संभाव्य दुर्घटनेची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

### दहशतवाद्यांचे कंबरडे मोडण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे मरीन कमांडो अमित राणांचे निधन

कांगडा : हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्याच्या ज्वालामुखी भागातून अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. भारतीय नौदलातील एक प्रतिष्ठित 'मरीन कमांडो' आणि 'शौर्य चक्र' विजेते अमित सिंग राणा (वय ३२) यांचे एका रस्ते अपघातात अकाली निधन झाले आहे. सोमवारी रात्री उशिरा खुंडियान भागातील 'लाहरू' येथे त्यांची कार नियंत्रणाबाहेर गेली आणि सुमारे ५०० फूट खोल दरीत कोसळली. राष्ट्ररक्षणासाठी अदम्य धैर्य आणि पराक्रमाचा उत्कृष्ट आदर्श घालून देणाऱ्या या शूर योद्ध्याच्या निधनामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमित राणा हे रजेवर घरी आले होते. त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, ते सोमवारी सकाळीच घरी पोहोचले होते आणि त्यांना आपल्या कुटुंबासोबत निवांत वेळ घालवण्याची संधीही अद्याप मिळाली नव्हती. त्याच रात्री उशिरा एका मित्राला भेटून घरी परतत असताना लाहरू जवळच्या एका धोकादायक वळणावर त्यांच्या कारवरील नियंत्रण सुटले आणि ती खोल दरीत कोसळली. हा अपघात रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडला. अपघाताची बातमी मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी धावून आले. दरीची खोली प्रचंड असल्याने मदत आणि बचावकार्य करणे अत्यंत आव्हानात्मक ठरले. सुमारे एक तासाच्या अथक प्रयत्नांनंतर अमित राणा यांना अत्यंत गंभीर अवस्थेत दरीतून वर रस्त्यावर आणण्यात आले आणि त्यांना तात्काळ खुंडियान येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अपघात घडला होता, त्या ठिकाणी पोहोचणे हेच मुळात एक अत्यंत कठीण काम होते.

कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला : अमित राणा हे त्यांच्या आई-वडिलांचे एकुलते एक पुत्र होते आणि त्यांना दोन बहिणी आहेत. त्यांच्या पश्चात त्यांची आई पवन कुमारी, वडील (नाईब सुभेदार) केवल सिंग राणा, पत्नी मीनाक्षी राणा आणि त्यांचा चार वर्षांचा निरागस मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या अचानक आणि अकाली निधनामुळे त्यांचे कुटुंब पूर्णपणे कोलमडून गेले. या दुःखद घटनेने ज्यामध्ये एका चार वर्षांच्या निरागस बालकाने आपल्या वडिलांचे छत्र गमावले आहे, संपूर्ण परिसराला हादरवून सोडले असून, प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आहेत.

### आंतराष्ट्रीय ड्रग्ज कार्टेल पोखरतेय युवा पिढी, मुंबई पोलिसांच्या कारवाईत दोन राज्यांमधून १०० कोटींचा मुद्देमाल जप्त

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रासह तेलंगणा आणि गुजरातमधील युवा पिढीचं प्रचंड नुकसान करणाऱ्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज कार्टेलचा मुंबई पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. मुंबई पोलिसांनी गुजरात आणि तेलंगणामध्ये कारवाई करून सुमारे १०० कोटींचा मुद्देमाल जप्त केला आहे.ओला-उबर चालक असल्याचं भासवून मुंबई आणि उपनगरात ड्रग्ज पुरवणारी महिला कार चालक आणि तिला ड्रगचा पुरवठा करणारा पप्पू यांना मुंबई पोलिसांनी जेरबंद केलंय. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर मुंबई पोलिसांनी गुजरातच्या नर्मदा जल्ह्यातील एका गावात छापा टाकून एमडी तयार करण्याचा कारखाना उद्ध्वस्त करत तिथून ७५ कोटींचे अंमली पदार्थ हस्तगत केलेत. तर अन्य एका अशाच कारवाईत मिरा-भाईंदर आणि वसई-विरार पोलीसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत तेलंगणातील जाहिराबाद येथे सुरू असलेला एमडी ड्रग्ज तयार करण्याचा कारखाना उद्ध्वस्त केला. या कारवाईत २१ कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारखान्यात दररोज २० कोटींचे अमली पदार्थ तयार केले जात असल्याचा दावा पोलिसांनी केलाय.

मुंबईतील साकीनाका पोलीस ठाण्याची अंमलीपदार्थ विरोधी शाखेनं गुजरात राज्यातील नर्मदा जिल्ह्यात एका गावात छापा टाकून एमडी (मफेड्रोन) या अमली पदार्थ निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त केलाय. साकीनाका पोलिसांनी या कारखान्यातून जवळपास ७५ कोटींचा मुद्देमाल हस्तगत केला. यात तब्बल २० किलो लिक्विड एमडीचा समावेश आहे.

# 'पोलीस शेतकऱ्याच्या बांधावर' उपक्रमातून ६६३ शेतीविषयक प्रकरणांचे यशस्वी निवारण





**लातूर/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्या त्यांच्या बांधावर जाऊन समजून घेणे, शेतीविषयक तक्रारी व वादांचे तातडीने निवारण करणे तसेच पोलीस आणि शेतकरी यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ करणे या उद्देशाने, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत दिनांक १६ मार्च २०२६ ते ३० मे २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेला ''पोलीस शेतकऱ्याच्या बांधावर'' हा अभिनव उपक्रम ग्रामीण भागात अत्यंत प्रभावी आणि यशस्वी ठरला. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या समस्यांसाठी थेट शेतशिवारात आणि बांधावर न्याय मिळण्याचा मार्ग उपलब्ध झाला.

शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्यांना शेती रस्ते, बांधावरील वाद, पाणी वाटप, अतिक्रमण, मालकी हक्क, वहिवाट, पीक काढणी, जमिनीचे वाटप तसेच विविध कौटुंबिक व सामाजिक वादांना सामोरे जावे लागते. अशा प्रश्नांसाठी शेतकऱ्यांना पोलीस ठाणे व इतर कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत होत्या. ही गैरसोय दूर करण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या ऐकण्याचा आणि त्यांचे तातडीने निवारण करण्याचा लोकाभिमुख उपक्रम राबविला.

दिनांक १६ मार्च २०२६ ते ३० मे २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे अधिकारी व अंमलदार यांनी विशेष मोहिमेअंतर्गत गावोगावी, शिवारात आणि शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष संवाद साधला. या कालावधीत लातूर जिल्ह्यातील तब्बल १००२ गावाना ग्रामभेटी देण्यात आल्या. ग्रामभेटीदरम्यान शेतकऱ्यांच्या तक्रारी, अर्ज व वादांची माहिती घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली. अनेक ठिकाणी दोन्ही पक्षांना समजावून सांगून समुपदेशन व मध्यस्थीच्या माध्यमातून जागीच सामोपचाराने तोडगा काढण्यात आला.

या विशेष मोहिमेदरम्यान प्राप्त झालेल्या एकूण ६६३ शेती व जमीनविषयक तक्रारींचे यशस्वी निवारण करण्यात आले. त्यामध्ये
- मालकी हक्क व वहिवाट संदर्भातील ११९ प्रकरणे,
- बांधावरून झालेल्या भांडण व वादांची १३६ प्रकरणे,
- पाणी हक्क व पाणी वाटप संदर्भातील ४९ प्रकरणे,
- मोजणी संदर्भातील ५० प्रकरणे,
- जमिनीच्या वाटप संदर्भातील ५७ प्रकरणे,
- पीक काढणी संदर्भातील १० प्रकरणे
- तसेच इतर स्वरूपाची ३३ प्रकरणे

निकाली काढण्यात आली.

या मोहिमेचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे शेतीसंदर्भातील अनेक तंटे न्यायालयीन वादात किंवा गंभीर गुन्ह्यांमध्ये रूपांतरित होण्यापूर्वीच सामोपचाराने मिटविण्यात यश आले. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि मानसिक त्रास मोठ्या प्रमाणात वाचला असून ग्रामीण भागातील सामाजिक सलोखा टिकविण्यास मदत झाली आहे. अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांनी पोलीस प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करून समाधान व्यक्त केले आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला असून पोलीस हे केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारी यंत्रणा नसून नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असलेली लोकाभिमुख संस्था आहे, ही भावना अधिक बळकट झाली आहे.

याबाबत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले की, ''शेतकरी हा आपल्या समाजाचा आणि अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. त्यांच्या समस्या वेळेत सोडविणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पोलीस शेतकऱ्याच्या बांधावर या उपक्रमातून आम्ही केवळ तक्रारींचे निवारण केले नाही, तर पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वासाचे बंध अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सातत्यपूर्ण ग्रामभेटी आणि विशेष मोहिमांमुळे शेतीविषयक अनेक तंटे सामोपचाराने मिटत असून ग्रामीण भागात शांतता, सलोखा आणि कायद्याबद्दलचा आदर वाढत असून भविष्यातही हा उपक्रम अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्यात येईल.

पोलीस शेतकऱ्याच्या बांधावर'' हा उपक्रम लातूर जिल्हा पोलीस दलाच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचे उत्तम उदाहरण ठरत असून ग्रामीण भागातील तंटामुक्ती, संवाद आणि विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

## स्कूल बसचालकांना डिझेल नाकारणाऱ्या पेट्रोल पंप चालकांवर कारवाई करा; अन्यथा तीव्र आंदोलन!

### धर्मवीर मराठा महासंग्राम संघाचा उदगीर उपविभागीय अधिकाऱ्यांना इशारा

**उदगीर/प्रतिनिधी :** नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर उदगीर शहरातील पेट्रोल पंप चालकांकडून स्कूल बस चालकांबाबत अत्यंत अन्यायकारक भूमिका घेतली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. शहरात स्कूल बससाठी एका वेळी केवळ ५०० रुपयांचेच डिझेल देण्याची इंधन मर्यादा घालण्यात आली आहे. पेट्रोल पंप चालकांच्या या मनमानी कारभारामुळे विद्यार्थी वाहतूक विस्कळीत होण्याची आणि विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या अन्यायकारक इंधन मर्यादेविरोधात आज धर्मवीर मराठा महासंग्राम संघ (तालुका उदगीर) च्या वतीने उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांना रीतसर निवेदन देऊन तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे.

प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, येत्या काही दिवसांतच नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असून शाळा पूर्ववत सुरू होणार आहेत. उदगीर शहर आणि परिसरातील ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी सुरक्षित वाहतुकीसाठी स्कूल बसवर अवलंबून असतात. मात्र, सध्याच्या इंधन दरानुसार ५०० रुपयांत फक्त ५ ते ६ लीटर डिझेल मिळते. एवढ्या कमी इंधनात स्कूल बसच्या दिवसभरातील फेऱ्या म्हणजेच विद्यार्थ्यांना सकाळी शाळेत नेणे आणि दुपारी सुरक्षितपणे परत आणणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे.

मोठ्या वाहनांना सवलत, स्कूल बसवरच मर्यादा का? एकीकडे स्कूल बसला केवळ ५०० रुपयांची मर्यादा घातली जात असताना, दुसरीकडे मोठ्या ट्रान्सपोर्ट वाहनांना (ट्रक, कंटेनर इ.) पेट्रोल पंपांवरून अमर्यादित () डिझेल पुरवले जात आहे. हा व्यावसायिक दुजाभाव असून स्कूल बस चालक आणि विद्यार्थ्यांच्या हक्कावर सरळ-सरळ अन्याय आहे, असा आरोप



संघटनेने केला आहे.

शाळा सुरू झाल्याच्या पहिल्याच दिवसापासून जर बसला पुरेसे डिझेल मिळाले नाही, तर शहरातील संपूर्ण विद्यार्थी वाहतूक व्यवस्था ठप्प होईल. यामुळे पालकांची मोठी गैरसोय होईलच, शिवाय विद्यार्थ्यांना वेळेवर शाळेत पोहोचणे कठीण होऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान होईल. ऐनवेळी विद्यार्थ्यांना इतर असुरक्षित वाहनांनी प्रवास करावा लागल्यास त्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. स्कूल बस ही केवळ व्यावसायिक वाहतूक नसून ती विद्यार्थ्यांशी संबंधित एक अत्यावश्यक सेवा आहे, याचे भान पेट्रोल पंप चालकांनी ठेवणे गरजेचे आहे, अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी उपविभागीय अधिकाऱ्यांनी या विषयात तातडीने मध्यस्थी करावी. उदगीर शहरातील पेट्रोल पंप असोसिएशनची तातडीने बैठक घेऊन, स्कूल बस चालकांना त्यांच्या गरजेनुसार पुरेसे डिझेल प्राधान्य क्रमाने उपलब्ध करून देण्याबाबत कडक निर्देश द्यावेत, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. जर वेळेत यावर तोडगा निघाला नाही आणि शाळा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांची गैरसोय झाली, तर मराठा महासंग्राम संघ स्कूल बस चालकांच्या पाठीशी उभा राहून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

याप्रसंगी मराठा महासंग्राम संघाचे जिल्हाध्यक्ष (लातूर ग्रामीण) श्री. देवाभाऊ घंटे, तालुका अध्यक्ष श्री. राजकुमार भालेराव, जिल्हा सचिव श्री. मोहनेश्वर विश्वकर्मा, जिल्हा उपाध्यक्ष श्री. महेबूब सय्यद, तालुका सचिव श्री. सावन तोरणेकर, तालुका संघटक श्री. संदिप जाधव, मिडीया प्रमुख श्री. श्रीधर सावळे, तालुका संघटक श्री. नारायण घोणशेट्टे, श्री. सुरज अटोळकर, शहराध्यक्ष श्री. खाजाभाई शेख, तालुका उपाध्यक्ष श्री. नरसिंग बनशेळकीकर, शहर संघटक श्री. रहीम शेख, तालुका संघटक श्री. राजकुमार सावळे, आणि तालुका सहसंघटक श्री. संजय बोरगावे यांसह संघटनेचे स्कूल बस युनियन चे सदस्य बालाजी कवठाळे.प्रकाश पाटील.शिवकुमार पटवारी.सुजित शिवशट्टे. राहुल मदने. पोस्ते पोद्दार स्कूल उदगीर.धनराज डुमने. आमर चिंचोळे.महेश स्वामी.बाळू गोटमुकले. यशवंत सूरनर.बालाजी नागपल्ले.अभिजित गायकवाड.नागनाथ म्हेत्रे.धनराज सनगले.बालाजी केंद्रे.बालाजी कुंभार युनियन चे पदाधिकारी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी आमदार विप्लव बाजोरिया आणि गोपीकिसन बाजोरियांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या गोंधळाप्रकरणी माजी आमदार विप्लव बाजोरिया, त्यांचे वडील माजी आमदार गोपीकिसन बाजोरिया आणि आणखी एका सहकाऱ्याविरुद्ध गाडगे नगर पोलीस ठाण्यात रात्री एक वाजता गुन्हा दाखल करण्यात आलाय. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालयातील कामकाजात अडथळा आणणं, शासकीय अधिकाऱ्यांना धमकावून आणि शासकीय कामात हस्तक्षेप केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आलाय.

असं आहे प्रकरण? : एफआयआरमध्ये नमूद केल्यानुसार दोन जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील महत्त्वाच्या बैठकीदरम्यान बाजोरिया पिता-पुत्रांनी गोंधळ घातल्याचा म्हटलं. अमरावती विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणूक २०२६ संदर्भातील नामनिर्देशन अर्जाची छाननी सुरू होती. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आणि इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी माजी आमदार विप्लव बाजोरिया आपल्या समर्थकांसह जिल्हाधिकारी कार्यालयातील महत्त्वाच्या सभागृहात पोहोचले. बाजोरिया यांनी आपल्या नामनिर्देशन अर्जासंदर्भात आक्षेप घेतल्याचं सांगत निवडणूक अधिकाऱ्यांना जाब विचारण्यास सुरुवात केली.

अधिकाऱ्यांची वाद, धमकीचा आरोप : या संपूर्ण प्रकरणात निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नामनिर्देशन अर्जावर घेतलेल्या निर्णयाबाबत संताप व्यक्त करत बाजोरिया यांनी जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी वाद घातला. अधिकाऱ्यांना अपशब्द वापरून बोलणं, निर्णय बदलण्यासाठी दबाव टाकणं आणि शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा आरोप एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

यासह बाजूला यांचे वडील गोपीकिसन बाजोरिया यांनीही अधिकाऱ्यांची वाद घालत कार्यालयातील वातावरण तणावपूर्ण केल्याचा उल्लेख तक्रारीत आहे. यावेळी उपस्थित असलेल्या काही समर्थकांनी देखील अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचं तक्रारीत नमूद करण्यात आलं आहे.

निवडणूक प्रक्रियेत अडथळा : तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणामुळे नामनिर्देशन अर्ज छाननीची प्रक्रिया काही काळ विस्कळीत झाली. निवडणूक निर्णय अधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांना आपलं काम सुरळीतपणे करता आलं नाही. त्यामुळं शासकीय कामात अडथळा निर्माण झाल्याचं तक्रारीत नमूद आहे.

पोलिसांकडून तपास सुरू : घटनेची माहिती मिळाल्यानंतर गाडगे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणाचा तपास गाडगे नगर पोलिसांनी सुरू केला आहे.निवडणूक अर्जावर निकाल देण्याचा अधिकार जसा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा आहे, तसाच या निकालाची प्रत मागण्याचा अधिकारही माझा आहे. या निर्णयाला मला उच्च न्यायालयात आव्हान द्यायचे आहे. मला अजूनही निकालाची प्रत मिळालेली नाही. निकालाची प्रत मागणे गुन्हा असेल तर तो गुन्हा मी केला आहे, असे विप्लव व गोपीकिशन बाजोरिया यांनी सांगितलं.

# जागृती शुगर इंडस्ट्रीजच्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांचा मांजरा संचालकांच्या वतीने सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील खाजगी साखर उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत व राज्यस्तरीय स्तरावर नावलौकिक मिळवलेल्या जागृती शुगर इंडस्ट्रीजला केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल कारखान्याचे मार्गदर्शक तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांचा विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या वतीने बुधवारी आशियाना बंगल्यावर सत्कार करण्यात आला.

यावेळी सत्कार सोहळ्यास मांजरा साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोकराव काळे, माजी व्हाइस चेअरमन



श्रीशैल उटगे, ऊस विकास समिती अध्यक्ष कैलास पाटील, तात्यासाहेब देशमुख वसंत उफाडे, सदाशिव कदम, अनिल दरकसे, मदन भिसे, धनराज दाताळ, शंकरराव बोळंगे, निळकंठ बचाटे, नवनाथ काळे, सचिन शिंदे, ज्ञानेश्वर पवार, बालाजी पांढरे, दयानंद बिडवे, भैरू कदम तज्ञ संचालक कदम सुरेश चव्हाण, श्रीकृष्ण काळे, विलास चामले, अरुण कापरे तक्रार निवारण समिती अध्यक्ष तानाजी जाधव, कार्यकारी संचालक पंडित देसाई कामगार प्रतिनिधी शत्रुघ्न पाटील आदींची सदस्य उपस्थिती होती.

जागृती शुगर इंडस्ट्रीजने स्थापनेपासून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, गुणवत्तापूर्ण साखर उत्पादन, ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी जपलेले विश्वासाचे नाते आणि पर्यावरणपूरक उपक्रमांच्या माध्यमातून साखर उद्योगात वेगळी ओळख निर्माण केली तसेच मराठवाडा विदर्भ विभागात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक भाव देणारा कारखाना ठरला आहे. उत्पादन क्षमता वाढ, कार्यक्षम व्यवस्थापन आणि शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवून केलेल्या कामामुळे कारखान्याने राज्यातील आघाडीच्या साखर उद्योगांमध्ये स्थान मिळवले आहे.

**जागृति चा पुरस्कार एकत्रित प्रयत्नाचे फलित**

या पुरस्कारामुळे जागृती शुगर इंडस्ट्रीजच्या गुणवत्तापूर्ण कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली असून, हा सन्मान कारखान्याशी संबंधित शेतकरी, कर्मचारी आणि व्यवस्थापन यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित असल्याची भावना यावेळी जागृति शुगर चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी व्यक्त केली.

# निरोगी पोलीस दल हीच सक्षम कायदा-सुव्यवस्थेची हमी

## जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालयात विशेष मुख आरोग्य तपासणी व तंबाखूमुक्ती जनजागृती अभियान

**लातूर/प्रतिनिधी :** समाजाच्या सुरक्षेसाठी चोवीस तास कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचे आरोग्य सुदृढ राहणे ही काळाची गरज असून, निरोगी पोलीस दल हे प्रभावी आणि सक्षम कायदा-सुव्यवस्थेचे आधारस्तंभ आहे. याच उद्देशाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून जागतिक तंबाखूविरोधी दिनाच्या निमित्ताने इंडियन डेंटल असोसिएशन (आय.डी.ए.) लातूर शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे विशेष मुख आरोग्य तपासणी व तंबाखूमुक्ती जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास पोलीस अधिकारी, अंमलदार व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मुख आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच तंबाखू, गुटखा, मावा आणि धूम्रपानाच्या व्यसनामुळे उद्भवणाऱ्या गंभीर आजारांबाबत जनजागृती करण्यात आली.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. श्रीराम बनसोडे यांनी तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणारे ओरल सबम्युकस फायब्रोसिस (), ल्युकोप्लाकिया, मुखाचा कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांची माहिती दिली. मुखातील लहानसहान बदल, जखमा किंवा पांढरे-लाल चट्टे यांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर तपासणी करून उपचार घेणे किती महत्त्वाचे आहे, याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर उपक्रमादरम्यान तंबाखू अथवा इतर व्यसनांच्या आहारी गेलेल्या कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक समुपदेशन करण्यात आले. त्यांना व्यसनमुक्तीसाठी आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन, मानसिक आधार आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''पोलीस अधिकारी व कर्मचारी हे समाजाच्या सुरक्षेसाठी स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता अनेकदा कठीण परिस्थितीत कर्तव्य बजावत असतात. अशा परिस्थितीत त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. तंबाखू आणि तत्सम व्यसने केवळ व्यक्तीच्या आरोग्यावर परिणाम करत नाहीत, तर त्याच्या कार्यक्षमतेवर आणि कुटुंबाच्या जीवनावरही विपरीत परिणाम करतात. त्यामुळे प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्याने तंबाखूमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करून स्वतःच्या आरोग्याबरोबरच समाजासमोरही आदर्श निर्माण करावा. लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आरोग्य संवर्धनासाठी अशा विविध उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देण्यात येईल.'' त्यांनी आय.डी.ए. लातूर शाखेने राबविलेल्या या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण उपक्रमाचे विशेष कौतुक करत पोलीस दलाच्या आरोग्य संवर्धनासाठी दिलेल्या योगदानाबद्दल सर्व दंतचिकित्सकांचे आभार व्यक्त केले.

या अभियानात आय.डी.ए. लातूर शाखेचे डॉ. शैलेश पडगीळवार, डॉ. साफल्य कडातने, डॉ. श्रीराम बनसोडे, डॉ. सुप्रिया सोनटक्के, डॉ. पीयुष कटके, डॉ. ज्ञानेश्वर कराड, डॉ. पवन कुलकर्णी, डॉ. अजित साखरे, डॉ. निलम जाधव, डॉ. ज्ञानेश व्यास, डॉ. रुपाली कांबळे आणि डॉ. शितल रेड्डी यांनी सक्रिय सहभाग नोंदवून तपासणी व जनजागृतीचे कार्य पार पाडले.

कार्यक्रमाच्या शेवटी आय.डी.ए. लातूर शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच समाजामध्ये तंबाखूमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी आणि आरोग्यविषयक जनजागृती वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

हा उपक्रम केवळ आरोग्य तपासणीचा कार्यक्रम न ठरता पोलीस दलामध्ये आरोग्याविषयी सजगता, व्यसनमुक्तीची प्रेरणा आणि कर्करोग प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करणारा ठरला. समाजाच्या सुरक्षेबरोबरच पोलीस दलाच्या आरोग्य सुरक्षेलाही तितकेच महत्त्व असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## बेशुद्ध पडलेल्या मोराला जीवदान; पोलीस अन् वन विभागाची तात्काळ धाव



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील मळवटी रोड परिसरात आज सायंकाळी एक अत्यंत संतापजनक आणि हळहळ व्यक्त करणारी, पण तितकीच दिलासादायक घटना समोर आली आहे. सायंकाळी साधारण ६ वाजताच्या सुमारास या परिसरात एक राष्ट्रीय पक्षी मोर बेशुद्ध अवस्थेत पडला असल्याचे आढळून आले. मात्र, सुजाण नागरिक आणि प्रशासनाच्या तत्परतेमुळे या मोराला वेळेत उपचार मिळून त्याचे प्राण वाचले आहेत.

संपादकांच्या तत्परतेमुळे मोराला जीवदान

मळवटी रोड परिसरात हा मोर बेशुद्ध अवस्थेत पडलेला असताना, तेथून जवळच असलेले महाराष्ट्र जीवनचे संपादक खय्युम शेख यांच्या ही बाब निदर्शनास आली. त्यांनी वेळ न घालवता तात्काळ त्या मोराजवळ धाव घेतली. मोराला उचलून सुरक्षित स्थळी आणत त्यांनी प्रथमोपचार म्हणून त्याच्या चारा-पाण्याची व्यवस्था केली. तसेच या घटनेची माहिती तातडीने पोलिसांना दिली.

पोलीस आणि वन विभागाची तातडीने कारवाई

माहिती मिळताच विवेकानंद पोलीस ठाण्याचे पीआय संतोष पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळ गाठले. पोलीस कर्मचारी दिलीप गोविंदराव राजोळे आणि गोविंद केशव एरनुळे यांनी तत्परता दाखवत मोराला आपल्या ताब्यात घेतले आणि त्याची काळजी घेतली.

यानंतर पोलिसांनी तातडीने वन विभागाशी संपर्क साधला. वन विभागाचे कर्मचारी सतीश कांबळे हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस प्रशासनाने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हा मोर वन विभागाचे कर्मचारी सतीश कांबळे यांच्या स्वाधीन केला.

नागरिकांमधून कौतुकाचा वर्षाव

सध्या वन विभागाच्या देखरेखीखाली या मोरावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. महाराष्ट्र जीवनच्या संपादकांनी दाखवलेली सामाजिक बांधिलकी, विवेकानंद पोलीस ठाण्याचे पीआय संतोष पाटील, पोलीस कर्मचारी दिलीप राजोळे, गोविंद एरनुळे आणि वन कर्मचारी सतीश कांबळे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे एका मुक्या राष्ट्रीय पक्षाचे प्राण वाचले आहेत. या सर्व यंत्रणेच्या कौतुकास्पद कामगिरीचे लातूरकरांमधून जोरदार कौतुक होत आहे.

## सागरी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु; मच्छीमार युवकांना सहा महिन्यांचे विशेष प्रशिक्षण

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राचा विकास आणि विस्तार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागामार्फत 'सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन' या सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या १३६ व्या सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हे प्रशिक्षण मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, वर्सोवा, मुंबई येथे आयोजित करण्यात येणार असून इच्छुक मच्छीमार युवकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये नौकानयनाची मूलतत्त्वे, सागरी डिझेल इंजिनच्या विविध भागांची माहिती, देखभाल व दुरुस्ती, तसेच आधुनिक मासेमारी साधनांचा वापर यांचे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## संभाजी महाविद्यालयात दुरस्थ शिक्षण विभागाच्या परीक्षा सुरुळीत

**मुरूड/ महेंद्र आल्टे :** येथील संभाजी महाविद्यालयात दुरुस्थ शिक्षण विभागाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ( एम.ए., एम.कॉम.) परीक्षा दि. २७/०५/२०२६ पासून सुरू आहेत. सकाळ आणि दुपार सत्रात या परीक्षा सुरू आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांच्या मार्गदर्शनाखाली कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा संपन्न होत आहेत. परीक्षेचे सर्व कामकाज जबाबदारीने आणि तत्परतेने परीक्षा केंद्रप्रमुख प्रा. मधुकर क्षीरसागर पार पाडत आहेत. तसेच परीक्षेसाठी सहाय्यक म्हणून प्रा. डॉ. पी. एस. देशमुख, प्रा. डॉ. एस. एन. उबाळे कामकाज पाहत आहेत. त्याचप्रमाणे या परीक्षेसाठी श्री. प्रतिक जोशी, श्री. अरूण सवासे, श्री. सुनिल गाडे हे परीश्रम घेत आहेत.



## ठाकरे सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली, आश्वासनपूर्ती तर महायुतीने केली : नवनाथ बन यांचा हल्लाबोल

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून भाजप नेते नवनाथ बन यांनी उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. ठाकरे सरकारच्या कार्यकाळात शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीचा लाभ अनेक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला नाही आणि त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली, असा आरोप त्यांनी केला. नवनाथ बन म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात शेतकऱ्यांना मोठमोठी आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्षात अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहिले. शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांना अडचणीत आणण्याचे काम त्या सरकारने केले. याउलट महायुती सरकारने कोणतीही निवडणूक समोर नसतानाही दिलेली आश्वासने पूर्ण करण्यावर भर दिला आहे.

ते पुढे म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत महायुती सरकारने कर्जमाफीसह विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. फसव्या योजना भाजप किंवा महायुतीच्या नसून त्या ठाकरे आणि राऊत यांच्या नेतृत्वाखाली राबवल्या गेल्या होत्या, अशी टीकाही त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार कटिबद्ध असून दिलेले प्रत्येक आश्वासन पूर्ण केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आगामी विधान परिषद निवडणुकीबाबत बोलताना नवनाथ बन यांनी महायुतीतील सर्व घटक पक्ष एकजुटीने मैदानात उतरणार असल्याचे स्पष्ट केले. विधानसभा, लोकसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांप्रमाणेच विधान परिषद निवडणुकीतही समन्वयाने लढण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

महायुती राज्यातील सर्व १७ जागांवर विजय मि ळवेल, असा ठाम विश्वास व्यक्त करत बन म्हणाले की, राज्यातील जनतेचा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधींचा पाठिंबा महायुतीला मिळत आहे. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीतही म हायुती विजयाची हॅट्रिक करेल आणि विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहील.

राज्यातील राजकीय वातावरण तापू लागले असताना शेतकरी कर्जमाफी आणि विधान परिषद निवडणुकीच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे. आगामी काळात या विषयावर राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत मूल्यसाखळी भागीदार निवडीसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून प्रस्ताव आमंत्रित

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सोयाबीन, करडई, तीळ, भुईमूग आणि सूर्यफूल या प्रमुख तेलबिया पिकांच्या शाश्वत विकासासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियानतेलबिया सन २०२६-२७ अंतर्गत पीकनिहाय मूल्य साखळी भागीदार म्हणून पात्र शेतकरी उत्पादक कंपन्यांची निवड करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. लातूर जिल्हा तेलबिया समितीमार्फत निवडल्या जाणाऱ्या या भागीदार संस्थांना अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षण देणे, प्रमाणित बियाणे वितरण करणे, शेतकरी शेतीशाळा चालवणे, मूल्यसाखळी समूहातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे माती परीक्षण करणे आणि कृषी मॅपर पोर्टलवर लाभार्थ्यांची अचूक माहिती भरणे यांसारखे महत्त्वपूर्ण घटक व उपक्रम राबवावे लागणार आहेत.

या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी इच्छुक कंपन्या किंवा संस्था कंपनी कायदा अथवा सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक असून, संबंधित तालुक्यात काम करण्याचा त्यांना किमान ३ वर्षांचा अनुभव असावा म्हणजेच त्यांची नोंदणी माहे मार्च २०२३ पूर्वीची असणे बंधनकारक आहे. यासोबतच संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी किंवा सहकारी संस्थेमध्ये किमान २०० शेतकरी सभासद म्हणून नोंदणीकृत असावेत, सहकारी संस्था असल्यास तिच्या उद्दिष्टामध्ये तेलबिया पिकांशी संबंधित कामकाजाचा स्पष्ट उल्लेख असावा आणि मागील ३ वर्षांतील त्यांची सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रुपयांपेक्षा जास्त असावी. शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये शेतकऱ्यांचा किमान ३ लाख रुपयांचा समभाग असावा तसेच कमी उत्पादकता असणाऱ्या तालुक्यांमध्ये कार्यरत असलेल्या, सरकारकडून आधीच अनुदान प्राप्त झालेल्या आणि केंद्र सरकारच्या १० हजार शेतकरी उत्पादक संघ योजनेअंतर्गत किंवा नाफेड व एनएससी-ओएस सारख्या सार्वजनिक संस्थांकडे नोंदणीकृत असलेल्या तेलबिया क्षेत्रातील कंपन्यांना या निवड प्रक्रियेत विशेष प्राधान्य दिले जाईल.

तरी उपरोक्त सर्व पात्रता व निकष पूर्ण करणाऱ्या लातूर जिल्ह्यातील इच्छुक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे १५ जून २०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

## लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :** शेतकरी, कष्टकरी, गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त लातूर जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी विनम्र अभिवादन केले.

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि ग्रामीण विकासाच्या वाटचालीत अमूल्य योगदान देणारे, जनसामान्यांचे कार्यकुशल नेतृत्व, सामान्यांच्या हक्कासाठी झगडणारा नेता म्हणून स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे योगदान सदैव स्मरणात राहाणारे असून निःस्वार्थ सेवा, जनहिताच्या कामाची वृत्ती व लोकहिताची बांधिलकी ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक आहे.

समाजातील सर्व घटकासाठी काम करणारे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करुन विनम्र अभिवादन केले त्याचबरोबर भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांनीही युवा मोर्चाच्या सहकाऱ्यांसमवेत पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केले. अंबाजोगाई रोडवरील आ. कराड यांच्या भाजपा संवाद कार्यालयात अनेकांनी स्व. मुंडे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या अभिवादन कार्यक्रमास आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह युवानेते ऋषिकेशदादा कराड, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. उषाताई संभाजी पाटील तळेगावकर, उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, समाजकल्याण सभापती उत्तमराव माने, जिप सदस्य महादेव साळुंके, रामलिंग शेरे, तानाजी बिराजदार, उमेश उमापुरे, सौ. कविता गुट्टे, सौ. तुळजाबाई लोंढे, सौ. छायाताई चिंचोलकर, रेणापूर पस उपसभापती शरद दरेकर, प्रा. रामेश्वर बद्दर यांच्यासह भाजपाचे विक्रमकाका शिंदे, नाथसिंह देशमुख, बन्सी भिसे, अनिल भिसे, उद्धव काळे, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, प्रताप पाटील, राजकिरण साठे, विजय काळे, अमर चव्हाण, उद्धव फड, सौ. ललिता कांबळे, सौ. सुरेखा पुरी, अनुसया फड, बाबासाहेब भिसे, रुपेश काळे, बालाजी शिंदे, सतिष कात्रे, भैरवनाथ पिसाळ, आदिनाथ मुळे, गोपाळ पाटील, चंद्रकांत कातळे, अशोक राठोड, दत्ता सरवदे, ॲड. मनोज कराड, ज्ञानोबा भिसे, भागवत गित्ते, हणमंत गव्हाणे, अनंत पाटील, अशोक सावंत, किरण मुंडे, रमाकांत फुलारी, सिद्धेश्वर मामडगे, शिवदास बेद्रे, लक्ष्मण खलंग्रे, भगवान करमुडे, रमेश लहाडे, मेघराज जाधव, शंकर चव्हाण, सचिन लटपटे, ॲड. धनराज शिंदे, सोमनाथ वाघमारे, शुभम खोसे, संजय सुर्यवंशी, महेश सुडे, अक्षय स्वामी, कैलास सावंत, विजय चित्ते, रविंद्र नागरगोजे, गुणवंत करंडे, सुधाकर काळे, अजय शेळके, महादेव गुरुशेट्टे, ॲड, रुपेश थोरमोटे, उमेश सोमानी, प्रशांत शिंदे, ओम चप्पे, चंद्रकांत माने, गणेश चव्हाण, उत्तम चव्हाण, नरेश चपटे, श्रीमंत नागरगोजे, नाथराव गित्ते, नारायण राठोड, दिपक पवार, किशन क्षिरसागर, व्यंकट रसाळ, ईश्वर गोटके, केदार जाधव, दत्ता सप्ताळ, किरण इंगळे, संतोष नरवटे, बालाजी गवळी, निखील धुमाळ, गोपाळ पवार, पद्माकर होळकर, लक्ष्मण मुळे, लिंबराज सोमवंशी, धनंजय पवार, महादेव मुळे, राम पटणे, अच्युत इरपे, शाम भोळे, सुभाष राठोड यांच्यासह अनेकजण होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.